Indian Streams Research Journal
Vol - I , ISSUE - V [June 2011] : Botany **ISSN:-2230-7850**

धुळे जिल्ह्याचे ऐतिहासिक स्थान आणि महत्त्व

अनिल माणिकराव बैसाणे

इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे.

अ) भौगोलिक स्थान, विस्तार आणि क्षेत्रफळ

1998 पूर्वी धुळे जिल्हा हा अखंड असा जिल्हा होता. पण त्यानंतर 1 जुलै 1998 रोजी धुळे जिल्ह्याचे विभाजन होवून नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती झाली. सद्यस्थितीत धुळे जिल्ह्यात धुळे, शिरपूर, शिंदखेडा व साक्री असे चार तालुके असून जिल्ह्याचे मुख्य ठिकाण धुळे येथे आहे.

धुळे जिल्ह्याच्या पूर्वेस जळगांव जिल्हा व दक्षिणेस नाशिक जिल्हा आहे. पश्चिमेस गुजरात राज्य आहे. तर ईशान्येस मध्यप्रदेश हे राज्य आहे. धुळे जिल्ह्यात बराच भाग डोंगराळ आहे तर तापी नदीच्या खोऱ्यांचा भाग हा बहुतेक सपाट मैदानाचा आहे. डोंगराळ प्रदेश व सखल प्रदेश असे दोन प्राकृतिक विभागात या जिल्ह्याचा समावेश होतो. तापी नदी धुळे जिल्ह्यातील मुख्य नदी आहे. ती पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. या नदीला अरुणावती, पांझरा, बुराई, अमरावती इ. नद्या येऊन मिळतात. कान ही तापीची उपनदी आहे. यातील पांझरा नदीच्या काठावर धुळे शहर वसलेले आहे.

धुळे शहराचा विस्तार व स्थान उत्तर अक्षांश 21^0–10 आणि पूर्व रेखांश 75^0–20 या दरम्यान आहे. हे शहर समुद्र सपाटीपासून 240 मीटर म्हणजेच 787 फूट उंचीवर आहे.[1]

धुळे शहराचा खान्देशात समावेश केला जातो. हे शहर सामान्यपणे दख्खनच्या पठाराच्या वायव्य भागाकडे स्थानापन्न झालेले आहे. पूर्वी शहराला लागूनच वाहणारी पांझरा नदी आज शहराच्या विस्तारामुळे शहराच्या मध्यभागी आली आहे. नदीच्या उत्तरेस अनेक नगरे, उपनगरांची वाढ झाली आहे. प्रशासनाच्या सोयीसाठी या शहराची देवपूर, नेहरुनगर, विष्णूनगर, जुनेधुळे, नवीपेठ, माधवपुरा, मोगलाई, कुमारनगर इ. नगरांमध्ये विभागणी करण्यात आली आहे.

धुळे शहरावरून दोन महामार्ग व एक लोहमार्ग जातो. त्यात मुंबई–आग्रा महामार्ग व नागपूर–सुरत महामार्ग होय. चाळीसगाव–धुळे या मध्ये रेल्वेने हे शहर जोडले गेले आहे. हा एकेरी लोहमार्ग आहे. धुळे शहरातून जाणाऱ्या या लोहमार्ग व महामार्गांमुळे शहराचा सर्वांगीण विकास होत आहे.

शहराच्या उत्तरेला पांझरा नदी, दक्षिणेला लळींगच्या टेकड्या तर पूर्व आणि पश्चिम बाजूस माळरान व गायराने आहेत. धुळे शहर व उपनगर यांनी 10.3 मैल म्हणजेच 26.68 वर्ग कि.मी. एवढा भूभाग व्यापलेला आहे.[2]

2001 च्या जनगणनेनुसार धुळे शहराची लोकसंख्या 3,41,473 एवढी होती. त्यात पुरुषांचे प्रमाण 52 टक्के व स्त्रियांचे प्रमाण 48 टक्के होते. शहरांचा साक्षरता दराचा जर विचार केला तर त्यात पुरुषांचे प्रमाण 80 टक्के तर स्त्रियांचे प्रमाण 70 टक्के होते. 6 वर्षाखालील वयाच्या बालकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या 13 टक्के होती.

ब) ऐतिहासिक पार्श्वभूमी

आपला भारत हा अतिप्राचीन देश आहे. ज्या वेळेत बाकीचे खंड व देश सुप्तावस्थेत होते, त्यावेळीभारत अत्युच्य शिखरावर विराजमान झालेला होता. भारतात घरोघरी निघणारा सोन्याचा धूर पाहून बाकी देश थक्क होत होते. अशा पूर्व काळात 'षिक' नावाने ओळखला जाणारा असा जो प्रदेश होता त्याच प्रदेशात धुळे गावाची वस्ती झाली आहे.[3]

धुळे शहराचे अस्तित्वाचे पुरावे पाषाण युगापासून सापडतात. धुळे शहर ज्या ठिकाणी वसलेले आहे त्याठिकाणी मानवी अधिवासाचे अतिप्राचीन पुरावे आढळलेले आहेत.

पाषाण यगातील मानवाने नदी पात्रातील मोठ्या दगडगोट्यांपासून मोठमोठी दगडी हत्यारे तयार करून त्यांचा उपयोग जंगली प्राण्यांच्या शिकारीसाठी आणि कंदमुळे खोदण्यासाठी करीत असत. तापी नदीच्या खोऱ्यातील खास करून प्रकाशा आणि धुळे या तापी व पांझरा नदीच्या खोऱ्यातील शहरांवर इतर ठिकाणच्या अभ्यासामुळे अनेक अश्मयुगीन हत्यारे आढळलेली आहेत. त्यामुळे या ठिकाणावरून प्राचीन माणसांच्या जीवनमानावर विचारपूर्वक प्रकाश टाकला गेलेला आहे.

प्रकाशा येथील उत्खननामुळे उत्कृष्ट काचेच्या वस्तू आढळलेल्या आहेत. ज्या इ. स. पूर्व 3,4 शतकातील आहेत. तो कालावधी ढोबळमानाने सम्राट अशोक व मौर्य यांचा असावा. पितळखोरा येथील गुहामधील कोरीव लेखांवरून असे आढळते की या प्रदेशाचे सातवाहन घराण्याची राजधानी पैठणशी संबंध होता. म्हणून धुळे सातवाहन राज्याचा भाग असल्याचे सिद्ध होते.

इ. स. 90 ते 95 दरम्यान लिहिलेल्या 'पेरिपल्स ऑफ द ऐरी थ्री एन. सी.' पुस्तकात असा उल्लेख आढळतो की, पैठण आणि तगारा (उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर) येथून तापी नदीच्या दोन्ही किनाऱ्यालगत असलेल्या मार्गावर धुळे मार्गे बडोदा येथे मालाची ने–आण केली जात असे. हा प्रदेश गौतमीपुत्र सातकर्णी याच्या अधिपत्याखाली असल्याचे इतिहासकारांना वाटते.

इ. स. चवथ्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत कुठलीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. शिरपूर व इतर ठिकाणी असलेल्या नोंदीनुसार इ. स. 316 ते 337 या दरम्यान सॅमीदास बुलूंद आणि रूद्रवास खान्देशावर राज्य करीत होते. परंतु ही माहिती अपूर्ण व असमाधानकारक आहे. इ. स. 5 व्या शतकाच्या शेवटपर्यंत पुलकेशी घराण्यातील चालुक्य राजे राज्य करीत होते.[4]

जळगाव जिल्ह्यातील मेहुणबारे येथे सापडलेल्या ताम्रपटावरील, शके 624 इ. स. 702 या साली सापडलेल्या लेखावरून असे आढळते की, सेंद्रकांच्या घराण्यानंतर राष्ट्रकुटांच्या अधिपत्याखाली हा प्रदेश होता. राष्ट्रकुटांच्या ऱ्हासानंतर अनेक छोट्या–मोठ्या राजांनी धुळे शहरावर राज्य केले.

इ. स. 13 व्या शतकाच्या शेवटी देवगिरीचे यादव यांचे राज्य आले. या राजांनी देशात शांतता व सुव्यवस्था आणली. शहरास भरभराटीस आणले.

इ. स. 1294 मध्ये अल्लाउद्दिन खिलजीच्या आक्रमणाला यादव राजे शरण गेलेत. इ. स. 1318 पर्यंत हिंदुराजाचे देवगिरी येथील राज्य संपुष्टात आले. इ. स. 1370 मध्ये खिलजीने या प्रदेशावर ताबा ठेवला. फिरोज तुघलक याने मलिकराजा फारूखी याला थाळनेर व करवंद याची जहांगिरी दिली व हा प्रदेश धुळे प्रांतास जोडला गेला. (1370) यावेळी देवपूर आणि जुनेधुळे येथे दोन गढ्या बांधण्यात आल्या. पण त्यापैकी देवपूर येथील किल्ला 1872 च्या पांझरा नदीच्या पुरामध्ये वाहून गेला होता. त्या किल्ल्यावर इ. स. 1600 पर्यंत फारूखी राजाचे अधिपत्य होते.

अकबराच्या राज्यात धुळे हा प्रांत मुघलांच्या अधिपत्याखाली आला. इ. स. 1723 मध्ये माळव्याचा गव्हर्नर निजाम–उल–मुख–असफ–जॉह–1 ने बंड पुकारले व स्वतंत्र झाला. तो इ. स. 1748 मध्ये मरण पावला. त्याचा मुलगा सलाबत जंग इ. स. 1752 साली या प्रांताचा निजाम झाला. परंतु भाल्कीच्या मराठ्यांनी त्याचा पराभव केला व भाल्कीच्या तहानुसार संपूर्ण खान्देश इ. स. 1818 पयत हा प्रदेश मराठ्यांच्या अधिपत्याखाली होता. इ. स. 1803 मध्ये पडलेल्या भयानक दुष्काळात हा प्रदेश संपूर्ण नष्ट झाला.[5]

इ. स. 1804 मध्ये सरदार विंचूरकर यांच्या अधिपत्याखाली हा प्रदेश आला. त्यांनी बालाजी बळवंत या अधिकाऱ्यास धुळे भागात पाठवून हे गांव पुन्हा वसविले. याचवेळी देवपुरातील मढी व गणेशपेठ यांची दुरुस्तीही केली.

सोनगीर ते धुळे हा भाग त्यांच्या देखरेखीखाली होता. त्यामुळे त्यांनी कारभार पाहण्यासाठी धुळ्याची निवड केली. इ. स. 1818 पर्यंत हा भाग पूर्णपणे मराठ्यांच्या देखरेखीखाली होता. इंग्रजांनी मराठ्यांचा पराभव केला. या भागावर देखरेख ठेवण्यासाठी कॅप्टन ब्रिग्ज या इंग्रज अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्यावेळी धुळे शहराचे जुनेधुळे, देवपूर व मोगलाई असे तीन भाग होते.

या शहराची अधिक वाढ व विकास व्हावा या दृष्टीने कॅप्टन ब्रिग्जने ब्राह्मणपूर येथील व्यापारी बोलविले, तर मुंबई, सुरत येथून सुतार, सुवर्ण कामगार व चर्मकार यांना बोलवण्यात आले. त्यांच्यासाठी निवास, कार्यालये मोफत जमिनी, कर सवलत इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. सार्वजनिक इमारती बांधण्यात आल्या. यामुळे जुने रहिवाशी देखील शहरात परत येऊ लागलेत. उद्योगधंदे कारखान्यांची उभारणी करून पुन्हा एकदा धुळे शहराची भरभराट झाली.

धुळे शहरातील होणारी कारखान्यांची, लोकसंख्येची, व्यापाराची वाढ पाहून ग्रेट इंडियन पेनिन शुला रेल्वेने हे शहर जोडले गेले. जी सध्या मध्यरेल्वे म्हणून ओळखली जाते. दिनांक 15/10/1900 साली चाळीसगाव ते धुळे रेल्वेमार्ग सुरु करण्यात आला.

त्यानंतर कॉटन प्रेस, तेल गिरण्या, कापडगिरणी व इतर उद्योगधंद्यांची वाढ झाली. त्यातच अमळनेरचे दानशूर श्री. प्रतापशेठजी यांनी दिनांक 24/12/1923 रोजी न्यू प्रताप स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल सुरू केली.

अनेक मंदिरे, ऐतिहासिक व राजकीय पुरुषांचे पुतळे, विविध शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था धुळ्याच्या विकासात व सुंदरतेत भर घालीत आहेत. त्यांनासुद्धा ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. धुळे शहराला पुतळ्याचे शहर म्हटले जाते. शहरात महाराणा प्रताप, झाशीची राणी, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, सरदार वल्लभभाई पटेल, अहिल्याबाई होळकर, लोकमान्य टिळक, गुरु शिष्य स्मारक, संत तुकाराम महाराज, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे इ. ऐतिहासिक राजकीय पुरुष व संत महंतांचे पुतळे धुळे शहर वासियांना आपल्या कार्याचे स्मरण करून देत आहेत.

धुळे शहरात पुतळ्यांव्यतिरिक्तसुद्धा विविध देवदेवतांची मठ, मंदिरे उभारली गेली आहेत. त्यात पेशवेकालीन गणेशमंदीर, राममंदीर, कालिकादेवी मंदीर, बालाजी मंदिर, एकविरा देवी मंदीर, जैन मंदिर आदि पुरातन मंदीरांचा समावेश आहे. या मंदिरांना फार जुना ऐतिहासिक वारसा लाभला आहे.

वाग्देवता मंदीर, गांधी तत्त्वज्ञान मंदिर ही दोन मंदिरे लोकांच्या धार्मिकतेबरोबरच आपल्या ग्रंथ संपदेच्या माध्यमातून लोकांचा बौद्धिक विकास घडवत आहेत.

धुळे शहराच्या विकासात विविध जुन्या नव्या शैक्षणिक संस्था दिवसेंदिवस भर घालीत आहेत. गरुड हायस्कूल, कमलाबाई कन्याशाळा, शिवाजी विद्याप्रसारक संस्था, अभिनव विद्या मंदिर, ऊर्दू हायस्कूल, हिंदू एज्युकेशन सोसायटी, आघाव शैक्षणिक संस्था, शासकीय तंत्र निकेतन, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वेद पाठ शाळा, जयहिंद, विद्यावर्धिनी अशा अनेक शासकीय व खाजगी शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्था धुळे शहराची जगात ओळख करून देत आहेत. धुळे शहरातील विविध व्यायाम शाळांनी फक्त राज्यच नाहीतर राष्ट्रीय स्थरावर मल्ल पाठविले आहेत. धुळे शहराला लाल मातीचाही वारसा लाभलेला आहे.[6]

संदर्भ :

1. Maharasthra *State Gazetteer Dhulia* District, 1974. Page 798
2. ***तत्रैव.***
3. नाि"ाककर क. वी., ***धुळे नगरपालिका भातसंवत्सरी महोत्सव ग्रंथ,*** धुळे नगरपालिका, 1962, पृ. 01.
4. Maharasthra State Gazetteer Dhulia District, 1974. Page 798-99.
5. नाि"ाककर क. वी., ***उपरोक्त,*** पृ. 4.
6. ***महाराश्ट्र राज्य जिल्हा परिचय धुळे जिल्हा,*** जिल्हा पब्लिसिटी ऑफीस, धुळे 1961, पृ. 18.

अनिल माणिकराव बैसाणे
इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे.